0 1 AUG 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा विद्यापीठामुळे शैक्षणिक क्षेत्राला प्लॅटफार्म मिळाला : कुलगुरू डॉ. शिर्के



वारणानगर : येथील वारणा विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार करताना वारणा समूहाचे प्रमुख आमदार डॉ. विनय कोरे. शेजारी एन. एच. पाटील, डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, प्राचार्य ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, डॉ. किरण पाटील आदी.

वारणानगर, कोडोली : वारणा विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून मला विशेष आनंद आहे. वारणेत प्रत्येक विद्यार्थ्याला प्रेरणा मिळते, वारणा ब्रँडची झळाळी आणखी वाढवायला पाहिजे. नजीकच्या काळात पॅरामिटॅकलची गरज आहे, त्यावर दिशा ठरणार आहे. तात्यासाहेब कोरे यांची दूरदृष्टी मोठी होती. त्यांच्या दूरदृष्टीतून एक प्रकारची प्रयोगशाळा साकारली आहे. त्यामुळे वारणेचा ब्रँड देशभरात प्रसिद्ध आहे, म्हणून वारणा विद्यापीठ 'क्लस्टर मॉडेल' बनवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे बोलताना केले.

वारणा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांचा वारणा परिवाराच्या वतीने आमदार डॉ. विनय कोरे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी

व्यासपीठावर सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील, वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी उपस्थित होते.

डॉ. शिर्के पुढे म्हणाले, वारणा विद्यापीठ व्हावे, हे आमदार विनय कोरे यांचे स्वप्न होते आणि ते त्यांनी साकारले. डॉ. कोरे म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरू हे पद कमी लोकांच्या भाग्यात असते. वाठार सारख्या गावातील सुपुत्राला कुलगुरू होण्याचे मान भाग्य मिळाले. वारणा शिक्षण संकुल उंचीवर पोहोचले. वारणेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेकांनी मोठे योगदान दिले. वारणेला शिवाजी विद्यापीठाने नेहमी मदत केली, ही आठवण आम्ही विसरू शकत नाही. डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी म्हणाले, वारणा विद्यापीठाच्या मान्यतेबद्दल आणि वारणा शिक्षण मंडळ समूह विद्यापीठ झाले.

सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील यांनी वारणेचे नाव देशभर पोहोचले आहे. अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे काम वारणा विद्यापीठ करेल. यावेळी आंतरराष्ट्रीय पेटंट प्रा. सत्यनारायण आरडे, प्रा. राजकुमार पांडव, प्रा. रंगराव कावणे, प्रा. सचिन पुजारी, प्रा. गीतांजली गुरव, प्रा. उत्तम कदम यांनी संशोधन करून पेटंट मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. प्राचार्य डॉ. डी. एन. माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर प्रा. एन. आर. चोपडे यांनी कुलगुरूंचा परिचय करून दिला. यावेळी सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन.एच. पाटील, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, प्राचार्य डॉ. किरण पाटील आदी उपस्थित होते. प्रा. गणेश कांबळे, प्रा. नामदेव चोपडे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

## ■ एन. एच. पाटील कुलाधिकारी

वारणा विद्यापीठाच्या कुलाधिकारीपदी सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील यांची निवड केली असून, राज्यपाल यांच्याकडे प्रस्ताव पाठवला असल्याची घोषणा आमदार डॉ. कोरे यांनी केली.

0 1 AUG 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा विद्यापीठ क्लस्टर मॉडेल बनविण्याचा प्रयत्न करणार : शिर्के

## वारणा विद्यापीठ कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारला

लोकमत न्यूज नेटवर्क

**वारणानगर :** वारणा विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून मला विशेष आनंद आहे. सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या दूरदृष्टीतून वारणेचे नंदनवन साकारले, वारणेच्या शैक्षणिक क्षेत्राला व्यासपीठ मिळाल्याने वारणा विद्यापीठाची जबाबदारी वाढली असून हे विद्यापीठ क्लस्टर मॉडेल बनविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वारणा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांचा आमदार डॉ. विनय कोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील,



वारणा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार आमदार डॉ. विनय कोरे यांच्या हस्ते झाला. यावेळी सुराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील, सीईओ डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, आदी उपस्थित होते.

वारणा शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'वारणा विद्यापीठ झाल्यामुळे आमदार विनय कोरे यांचे स्वप्न साकारले असून, वारणा विद्यापीठ आपल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जायचे आहे. त्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत.

आमदार डॉ. कोरे म्हणाले,' विद्यापीठाचे कुलगुरूपद कमी लोकांच्या भाग्यात असते, पण वाठारच्या सुपुत्राला कुलगुरू होण्याचे भाग्य मिळाले. वारणा शिक्षण संकुल उंचीवर पोहोचले शैक्षणिक प्रगतीसाठी अनेकांनी योगदान दिले आहे. शिवाजी विद्यापीठाकडून नेहमीच सहकार्य लाभले आहे.

यावेळी सीईओ डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी, एन. एच. पाटील, प्राचार्य डॉ. डी. एन. माने डॉ. ए. एम. शेख, डॉ. किरण पाटील, प्रा. गणेश कांबळे आदी उपस्थित होते.

सकाळ




वारणानगर : वारणा विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार करताना आमदार डॉ. विनय कोरे. शेजारी एन. एच. पाटील, डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, प्राचार्य ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, डॉ. किरण पाटील आदी.

# वारणा विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देऊ

## डॉ. शिर्के : कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारला

वारणानगर, ता. ३१ : "तात्यासाहेब कोरे यांची दूरदृष्टी आणि आमदार डॉ. विनय कोरे यांच्या अथक परिश्रमातून 'वारणा ब्रॅन्ड' ही ओळख झाली आहे. वारणा विद्यापीठाला 'क्लस्टर मॉडेल' व आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही वारणा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे दिली.

वारणा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज सूत्रे स्वीकारली. यावेळी त्यांचा आमदार डॉ. विनय कोरे यांच्याहस्ते सत्कार झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सुराज्य फाउंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील, वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "वारणेत दूरदृष्टीतून एकप्रकारची प्रयोगशाळा साकारली आहे. त्यामुळे वारणेच्या शैक्षणिक क्षेत्राला प्लॅटफॉर्म मिळाला. वारणा विद्यापीठ व्हावे हे आमदार विनय कोरे यांचे स्वप्न होते आणि ते त्यांनी साकारले.' डॉ. कोरे म्हणाले, "वाठारसारख्या गावातील सुपुत्राला कुलगुरू होण्याचे भाग्य लाभले. वारणा शिक्षण संकुल उंचीवर पोहोचले. वारणेला शिवाजी विद्यापीठाने नेहमी मदत केली, हे आम्ही विसरणार नाही. विद्यापीठाच्या कुलाधिकारी एन. एच. पाटील यांची निवड केली आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्यपालांकडे प्रस्ताव पाठविला आहे.' डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी, एन. एच. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. सत्यनारायण आरडे, प्रा. राजकुमार पांडव, प्रा. रंगराव कावणे, प्रा. सचिन पुजारी, प्रा. गीतांजली गुरव, प्रा. उत्तम कदम यांचा पेटंट मिळविल्याबद्दल सत्कार झाला. प्राचार्य डॉ. डी. एन. माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. एन. आर. चोपडे यांनी कुलगुरूंचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, प्राचार्य डॉ. किरण पाटील उपस्थित होते. प्रा. गणेश कांबळे यांनी सूत्रसंचालन, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

पुढारी



वारणानगर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार करताना आ. विनय कोरे. शेजारी एन. एच. पाटील, डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, प्राचार्य ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, डॉ. किरण पाटील आदी.

# वारणा विद्यापीठला जगात मॉडेल विद्यापीठ बनवू : कुलगुरू शिर्के

**वारणानगर : पुढारी वृत्तसेवा**

आगामी काळात शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करून वारणा विद्यापीठ जगात मॉडेल विद्यापीठ बनवू, असे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वारणा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या पदाची सूत्रे गुरूवारी स्वीकारली. व्यासपीठावर सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन. एच. पाटील, वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी उपस्थित होते.

डॉ. आ. विनय कोरे म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरू हे पद कमी लोकांच्या भाग्यात असते. वाठार सारख्या गावातील सुपुत्राला कुलगुरू होण्याचा मान भाग्य मिळाले.

प्राचार्य डॉ. डी. एन. माने यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एन. आर. चोपडे यांनी कुलगुरूंचा परिचय करून दिला. यावेळी सुराज्य फाऊंडेशनचे अध्यक्ष एन. एच.पाटील, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, प्राचार्य डॉ. किरण पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले.

पुढारी



समीर सनगर



रोहित चव्हाण



स्मिता अलमान

# योगा स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्टस् असोसिएशनतर्फे इचलकरंजी येथे झालेल्या योगा स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या खेळाडूंनी भरघोस यश मिळविले.

स्पर्धेत समीर सनगर याने फॉरवर्ड बेंड आणि ट्विस्टिंग या प्रकारात, तर रोहित चव्हाण याने ट्रॅडिशनल आणि सुपाईन प्रकारांमध्ये सुवर्णपदकांची कमाई केली. दोघांची निवड छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे. तसेच स्मिता अलमान हिला ट्रॅडीशनल प्रकारात कांस्यपदक प्राप्त झाले. सर्वांना विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार, योगशिक्षिका सौ. विणा मालडीकर, सौ. प्रीती चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.